## जनसंपर्क विभाग

जळगाव २७ (प्रतिनिधी) : वाढत्या तापमानाचा धोका लक्षात घेवून परीक्षेच्या काळात परीक्षार्थी तसेच शिक्षक व कर्मचारी यांना उष्माघाताचा त्रास होवू नये यासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने सर्व महाविद्यालयांना परीक्षा केंद्रावर योग्य ती खबरदारी घेण्याचे निर्देश दिले आहेत.

सध्या विद्यापीठाच्या विविध परीक्षा केंद्रावर उन्हाळी परीक्षा सुरु आहे. जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यात ४३$^0$ C ते ४७$^0$ C असा तापमानाचा पारा चढला असल्यामुळे उष्णतेची लाट भडकली आहे. जळगाव जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांनी ३ जुन पर्यंत फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ चे आदेश लागू केले आहेत. परीक्षा केंद्रावर विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी यांना उष्णतेचा त्रास होवू नये यासाठी परीक्षा मूल्यमापन मंडळ संचालक प्रा. योगेश पाटील सर्व महाविद्यालयांना पत्र पाठविले आहेत. विद्यार्थ्यांना परीक्षेच्या काळात परीक्षा केंद्रात लवकर यावे तसेच रूमाल / स्कार्फ वापरून केंद्रावर येण्यास सांगावे. परीक्षेपुर्वी व परीक्षा संपल्यानंतर महाविद्यालयांत थांबण्यासाठी परवानगी देवून सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. ग्रंथालय, रिडींग रूम, महिला कक्षा यामध्ये पंखा व कुलरची व्यवस्था करण्यात यावी. परीक्षा केंद्रांवर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, उष्माघाताचा त्रास होवू नये यासाठी जास्तीत जास्त खबरदारी घ्यावी असे निर्देश या पत्राद्वारे महाविद्यायलयांना देण्यात आले आहे.

**बातमी क्र. २**

जळगाव २७ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणक शास्त्र प्रशाळेत रोजगाराभिमुख बी.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) या चार वर्षीय पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे गतवर्षापासून हा पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आहे. गतवर्षी या अभ्यासक्रमाला उत्तम प्रतिसाद मिळाला आहे.

संगणकक्षेत्रातील वाढती मागणी लक्षात घेवून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणा अंतर्गत बी.एस्सी. ऑनर्स (कॉम्प्युटर सायन्स) हा पदवी अभ्यासक्रम गतवर्षी सुरु करण्यात आला. यामध्ये मेजर डाटा सायन्स किंवा माहिती तंत्रज्ञान आणि मायनर साठी मॅथेमॅटीक्स किंवा डिजीटल इलेक्ट्रॉनिक्स या

## जनसंपर्क विभाग

विषयांसह पदवी घेण्याची संधी मिळाली आहे. गतवर्षी या विषयाला उत्तम प्रतिसाद मिळाला. १५० अर्ज प्राप्त झालेत त्यामधून १२वीच्या गुणवत्तेनुसार ६० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला.

यावर्षीची प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असून अर्ज व माहितीपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. २० जूनपर्यंत अर्ज ऑनलाईन भरण्याची मुदत आहे. या चार वर्षीय पदवीमध्ये संगणकशास्त्राच्या मुलभूत संकल्पना, डाटा स्ट्रक्चर्स, अल्गोरिदम, प्रोग्रॅमिंग भाषा, कृत्रिम बुध्दीमत्ता, मशिन लर्निंग, डेटा सायन्स आदी विषयांचा समावेश आहे. प्रोजेक्ट, इंटर्नशिप, अल्पमुदतीचे संशोधन प्रकल्प याचाही अभ्यासक्रमात समावेश आहे. मुख्य अभ्यासक्रमा व्यतिरिक्त विद्यापीठाच्या दुसऱ्या प्रशाळेतील विषयांमधून त्यांच्या आवडीचे पर्याय निवडता येतील. व्यावहारीक कौशल्यासह व्यावसायिक कौशल्य रूजविले जाणार आहेत. विद्यापीठाने विविध जीवनकौशल्य अभ्यासक्रमांचा (योगा, माईंड फुलनेस, तणाव व्यवस्थापन, आर्थिक साक्षरता, नैतिक तर्क, खेळ) समावेश केला आहे. कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांच्या मार्गदर्शनाखाली हा नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम तयार करण्यात आला असल्याची माहिती प्रशाळेचे संचालक प्रा. सतीष कोल्हे यांनी दिली.

.......................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: २७ मे, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी